महाराष्ट्र शासन

## विभागीय आरोग्य व कुटुंब कल्याण प्रशिक्षण केंद्र,छत्रपती संभाजीनगर

दूरध्वनी क्रमांक कार्यालय :- ०२४०, २४८५३४५
०२४०, २४८७७४२

कार्यालय :- प्राचार्य, आरोग्य व कुटुंब कल्याण प्रशिक्षण केंद्र, सिडको एन-५, छत्रपती संभाजीनगर - ४३१००१,

Email:- hfwtcabd@rediffmail.com
hfwtcabd@gmail.com

क्र.आवकुकप्रकेंछसं/भांडार/ झेरॉक्स /दरपत्रके/ 7470 /२४
दिनांक 30 / SEP 2024

# जहिरात

विषय:- कार्यालयीन कागदपत्रांच्या व प्रशिक्षण संबंधि छायांकित प्रती काढण्यासाठीच्या खर्चाचे दरपत्रके मागविणेबाबत.

प्राचार्य, आरोग्य व कुटूंब कल्याण प्रशिक्षण केंद्र छत्रपती संभाजीनगर येथे विविध कार्यशाळा व प्रशिक्षण सत्रे आयोजीत करण्यात येतात. प्रशिक्षणा संबंधी व कार्यालयीन कामाचे कागदपत्राची छायांकित प्रती काढण्यासाठी दरपत्रक मान्य झाल्यापासुन पुढील एक वर्ष कालावधी करिता दरपत्रके मागविण्यात येत आहे.

| अ.क्र. | झेरॉक्स सामुग्रीचा तपशिल | किंमत/दर प्रती नग/प्रत करासहित |
|---|---|---|
| १ | रंगीत छायांकित प्रत ए ४ साईज एका बाजुने | |
| २ | रंगीत छायांकित प्रत ए ४ साईज दोन्ही बाजुने | |
| ३ | ब्लॅक ॲण्ड व्हाइट छायांकित प्रत ए ४ साईज एका बाजुने | |
| ४ | ब्लॅक ॲण्ड व्हाईट छायांकित प्रत ए ४ साईज दोन्ही बाजुने | |
| ५ | ए ४ साईज साधी बायडींग/पट्टी बायडींग | |
| ६ | ए ४ साईज प्लास्टिक कव्हरसह स्पायरल बायडिंग | |
| ७ | रंगीत प्रमाण पत्र प्रींट ग्लॉसी पेपर ए ४ साईज | |

प्रशिक्षण संबंधी व कार्यालयीन कामाचे कागदपत्राची छायांकित प्रती काढण्यासाठी उपरोक्त प्रमाणे दरपत्रके मागविण्यात येत आहेत. इच्छुक व्यवसायिकांनी उपरोक्त प्रमाणे बाबनिहाय सिलबंद लिफाफा दरपत्रके दि.०१/१०/२०२४ ते १०/१०/२०२४ पर्यंत सायंकाळी ०५:०० पर्यंत या कार्यालयास सादर करावेत.

### अटी व शर्ती

१) संपुर्ण दरपत्रक अथवा त्याचा भाग कोणत्याही वेळी कोणतेही कारण न दर्शविता स्वीकारण्याचा किंवा नाकारण्याचा अधिकार प्राचार्य, आरोग्य व कुटूंब कल्याण प्रशिक्षण केंद्र छत्रपती संभाजीनगर यांनी राखुन ठेवलेला आहे.

२) दि. ०१/१०/ २०२४ ते दि.१०/१०/२०२४ या कालावधीत ठिक ५:०० वाजेपर्यंत कार्यालयीन वेळेत व्दि लिफाफा पध्दतीने दरपत्रके स्विकारण्यात येतील.

३) दरपत्रक सादर करण्याचा अंतिम दि.१०/१०/ २०२४ पर्यंत संध्याकाळी ०५:०० पर्यंत राहील.

Scanned with OKEN Scanner

४) एका स्वतंत्र सिलबंद लिफाफयामध्ये स्वंय साक्षांकित केलेली **निम्न लिखीत वैध प्रमाणपत्रे सोबत दिलेल्या हमीपत्रासह घालुन त्यावर प्रमाणपत्रे असे नमुद करावे व दुस-या सिलबंद लिफाफयामध्ये दर पत्रके घालुन त्यावर दरपत्रके असे नमुद करावे. दोन्ही लिफाफे एका मोठया लिफाफयामध्ये घालुन तो सिलबंद लिफाफा सादर करावा**.टपालाने अथवा कुरियरने पाठविलेली दरपत्रके विलंबाने प्राप्त झाल्यास ती रद्द समजली जातील.

५) सेवा पुरवठादार/सेवा केंद्र संचालकाचे मुंबई दुकाने व संस्था अधिनियम १९४८ अन्वये व्यवसाय नोंदणीचे अद्ययावत प्रमाणपत्र अथवा उदयोग आधार नोंदणी प्रमाणपत्र सादर करावे.

६) पॅनकार्ड व जीएसटी नोंदणी प्रमाणपत्र सादर करावे.

७) इच्छुक पुरवठादार व सेवा केंद्र संचालकाने संस्थेच्या लेटरपॅडवर किंमत दरपत्रक सर्व करासहित सादर करावे.

८) मागणी केलेले साहित्य पुरवठादाराने स्वखर्चाने प्रस्तुत कार्यालयास पुरवठा करावे.

९) पुरवठा केलेल्या छायांकित प्रती अस्पष्ट/खराब/ फाटलेल्या असल्याचे व काही कमी असल्याचे आढळल्यास पुरवठादाराने त्याप्रती लगेच बदलुन दयाव्यात.

१०) अस्पष्ट/खराब/फाटलेल्या छायांकित प्रतीचा मोबादला देण्यात येणार नाही. तसेच सदरील प्रतीचे बील अदा करण्यात येणार नाही.

११) दर पत्रक सादर करण्याची मुदत संपल्यानंतर प्राचार्य, आरोग्य व कुटूंबकल्याण प्रशिक्षण केंद्र, सिडको एन ५ छत्रपती संभाजीनगर कार्यालयात निवड समिती समक्ष दरपत्रके उघडण्यात येतील व त्याबाबत आपणांस कळविले जाईल. सदर दिवशी आपण अथवा आपले प्रतिनीधी उपस्थित नसला तरीही दरपत्रके उघडण्यात येतील व निवड समितीने घेतलेला निर्णय अंतिम राहील.

१२) देयकाची अदायगी NEFT/RTGS/PFMS/CMP पध्दतीनेच करण्यात येणार असल्याने संस्थेच्या लेटरपॅडवर आपल्या बॅक खात्याची माहिती सादर करावी.

१३) उपरोक्त प्रमाणे अ.क्र. १ ते १२ अटी व शर्ती मान्य असल्याचे संस्थेच्या लेटर पॅडवर हमी पत्र दयावे.

(डॉ.संतोष कडले)
प्राचार्य
आरोग्य व कुटुंब कल्याण प्रशिक्षण केंद्र,
छत्रपती संभाजीनगर

Scanned with OKEN Scanner

# हमीपत्र

मी/आम्ही/——————————————————————— पत्ता ——————— आज दि. / /२०२४ रोजी हमीपत्र लिहुन देतो की प्राचार्य, आरोग्य व कुटूंब कल्याण प्रशिक्षण केंद्र छत्रपती संभाजीनगर यांच्या संस्थेतील छायांकित प्रती काढणेकरिता मागविलेल्या दरपत्रकामध्ये नमुद केलेल्या १ ते १२ अटी व शर्ती काळजीपुर्वक वाचल्या असुन त्या मला/आम्हाला मान्य आहेत. तांत्रिक लिफाफयामधील प्रमाणपत्राचे शिथीलतेबाबतचे सर्व अधिकार दरपत्रके निवड समितीने राखुन ठेवलेले आहेत. सदर बाबीची जाणीव मला/आम्हाला आहे व ते मान्य आहे. १ ते १२ अटी व शर्तीचे पालन करण्याच्या अधिन राहुन मी आम्ही सदरील दरपत्रके सादर करिता आहोत.

स्थळः-

दिनांकः-

दरपत्रक धारकाची सही
व शिक्का

नावः-
पत्ताः-

**टीपः- सदरील हमीपत्र सादरकर्त्याने स्वाक्षरीत करुन तांत्रिक लिफाफा क्र.१ मध्ये बंद करुन सादर करणे बंधनकारक आहे.**

Scanned with OKEN Scanner